| MHKO160004702020 | नियमित दिवाणी दावा ६६/२०२० मधील नि.क्र.२१ खालील आदेश |
|---|---|

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २६ नियम ९ अन्वये कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी, कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी कथन केले की, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून घराचे बांधकाम केले असून दावा मिळकतीच्या हद्दी बेकायदेशीररित्या हलवून त्यामध्ये बदल केला आहे, त्यामुळे वादीचे निश्चित मोजमाप समजुन येत नाही. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज दावा वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणेकरीता वादी यांनी सदरचे दावा मिळकतीची कोर्ट कमिशनर यांचेमार्फत दावा मिळकतीची मोजणी होऊन व्हावी यासाठी सदरचा अर्ज दिला असून तो मंजूर करणेची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे वेळेत न दिलेने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेशिवाय पुढे चालविण्यात येत आहे.

३. मी वादी व त्यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंचे अभिलेखावरील वादपत्र, सोबत जोडलेले कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांचे कथनानुसार प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत अतिक्रमण करून घराचे बांधकाम केले असून दावा मिळकतीच्या हद्दी बेकायदेशीररित्या हलविल्या आहेत व त्यामुळे वादी यांचे क्षेत्राचे निश्चित मोजमाप समजून येत नाही. प्रतिवादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे वेळेत न दिलेने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेशिवाय पुढे चालविण्यात येत आहे. सबब, वादी यांची या अर्जातील कथने खरी व ग्राह्य समजण्यात येतात. सबब, वादी यांचे अर्जाचार विचार करता दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले आहे अथवा नाही याबाबत प्रमुख वाद असल्याचे दिसून येते. त्यामुळे, दावा मिळकतीमध्ये

प्रतिवादी यांनी अतिक्रमण करून घराचे बांधकाम केले आहे अथवा नाही, तसेच त्यांनी दावा मिळकतीच्या हद्दी हलविल्या आहेत अथवा नाही यासाठी मा. कोर्ट कमिशनर यांचे सुस्पष्ट अहवालाची गरज आहे. वादी, प्रतिवादी यांचे दरम्यानचा मुख्य वाद निकाली करण्यासाठी, दावा मिळकतीमधील वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. निरनिराळे वाद टाळण्यासाठी एकाच दाव्यात दोन्ही पक्षकारांचे सर्व वादमुद्दे निकाली काढणे गरजेचे आहे. सबब, वर नमूद निष्कर्शास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.२१ मंजूर करण्यात येत आहे.

२. मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. मा. कोर्ट कमिशनर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी वादी आणि प्रतिवादी यांना पूर्व नोटीसा देवून गाव गावडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर येथील पुढीलप्रमाणे मिळकतीं अ,ब,क,ड-

अ) भुमापन गट नं. ११४ याचे ७/१२ उतारे प्रमाणे एकूण क्षेत्र ५.६७.०० हे. आर. आकार रूपये २.६१ पैसे पैकी वादीचे कब्जेवहिवाटीस असलेली जमीन मिळकत १.८९.०० हे. आर. आकार ०.८६ पैसे ही संपूर्ण मिळकत

ब) भुमापन गट नं. ३६३ याचे ७/१२ उतारे प्रमाणे एकूण क्षेत्र ०.०९.१० आर. आकार रूपये ०.२२ पैसे पैकी वादीचे कब्जेवहिवाटीस असलेली जमीन मिळकत ०.०१.५२ आर. आकार ०.०४ पैसे ही संपूर्ण मिळकत

क) भुमापन गट नं. ३३७ याचे ७/१२ उतारे प्रमाणे एकूण क्षेत्र ०.१४.२० आर. आकार रूपये ०.३१ पैसे पैकी वादीचे कब्जेवहिवाटीस असलेली जमीन मिळकत ०.०२.३७ आर. आकार ०.०५ पैसे ही संपूर्ण मिळकत

ड) भुमापन गट नं. ३६८ याचे ७/१२ उतारे प्रमाणे एकूण क्षेत्र ०.११.०० आर. आकार रूपये ०.०९ पैसे पैकी वादीचे कब्जेवहिवाटीस असलेली जमीन मिळकत ०.०१.८३ आर. आकार ०.०१ पैसे ही संपूर्ण मिळकत

या वरीलप्रमाणे नमूद दावा मिळकतीं अ,ब,क व ड ची मोजणी करून दावा मिळकतींच्या हद्दीच्या खुणा निश्चित कराव्यात आणि त्या नकाशामध्ये

दर्शविण्यात याव्यात.

४. मा. कोर्ट कमिशनर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी दावा मिळकतींची मोजणी करून दावा मिळकतींमध्ये प्रतिवादी यांनी अतिक्रमण करून बांधकाम केले आहे अथवा नाही, तसेच दावा मिळकतींच्या हद्दी हलवून त्यामध्ये बदल केला आहे अथवा कसे याचा सुस्पष्ट अहवाल नकाशासह सादर करावा, तसेच प्रतिवादीं यांनी दावा मिळकतींमध्ये अतिक्रमण केलेले असल्यास ते नकाशामध्ये दर्शवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा.

५. वादी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी मा. कोर्ट कमिशनर यांची कमिशन फी त्यांचे कार्यालयात जमा करावी.

६. वादी आणि प्रतिवादी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी मा. कोर्ट कमिशनर यांना कमिशन कामी आवश्यक ती मदत करावी.

७. येणेप्रमाणे कमिशन रिट अदा करण्यात यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.12.05 11:09:48 +0530

दिनांक – ०४/१२/२०२३
स्थळ- शाहूवाडी

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर- शाहूवाडी, जि. कोल्हापुर